# `त्यांची' नाळ आजही रत्नागिरीशी जुळलेली!

Posted: 11:43 PM, 19/01/2014 by Parashuram Patil



रत्नागिरी - 'मुक्काम पोस्ट रत्नागिरी' कार्यक्रमात बोलताना रवी सावंत, सोबत उदयदादा लाड, जयु भाटकर आणि मंदार जोगळेकर. (छाया-माऊली फोटोज्, रत्नागिरी)

जागतिक मराठी अकादमीच्या `शोध मराठी मनाचा' या संमेलनामध्ये `मुक्काम पोस्ट रत्नागिरी' या कार्यक्रमातून रत्नागिरीचे सुपुत्र असलेले आणि आज देश-विदेशात कर्तृत्व गाजविणारे दिग्गज समोर आले. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रवी सावंत, `बुकगंगा'द्वारे जगभर मराठी पुस्तकांना पोहोचविणारे मंदार जोगळेकर, साहित्यिक आणि चित्रपट निर्माते उदयदादा लाड आणि दूरदर्शनवरील निर्माते जयु भाटकर यांनी या कार्यक्रमांतून रत्नागिरीतील आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या मनोगतात आजही त्यांची नाळ रत्नागिरीशी जोडलेली असल्याचे प्रकर्षाने जाणवले. हा कार्यक्रम उपस्थित विद्यार्थीवर्गासाठी प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमात निर्माते उदयदादा लाड यांनी आपण रत्नागिरीत माझ्यावर खेळाचे, शिक्षणाचे, गुरूजनांचे संस्कार झाले जे मला आयुष्यभर पुरले. आमच्यावेळी कब्बड्डीपटूंना रत्नागिरीत ग्लॅमर होते, हॉटेलवाले आम्हाला बोलवून डिंकलाडू, मसाला दूध देत असत. मैदानी खेळ हा माझा आत्मा होता. आज 71 व्या वर्षी मी मुक्त विद्यापीठातून पदवीधर होण्यासाठी प्रयत्न करतोय. मला दुःखात मरायचं नाही, तर समाजासाठी काही केल्याचे समाधान घेऊन या जगाचा निरोप घ्यायचाय. यासाठी युवारेल फाऊंडेशनची स्थापना केलेय. या माध्यमातून मी शाळा, हॉस्पिटल, चांगल्या व्यक्ती आणि संस्थांना मदत करतोय, असल्याचे समाधानपर उद्गार उदयदादा लाड यांनी यावेळी काढले.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रवी सावंत यांनी आजही मला देश-विदेशात कुठेही `तुम्ही कुठले?' असे विचारले की, `मी रत्नागिरीचा' असे उत्तर देत असल्याचे सांगितले. रत्नागिरीत असताना आंबा पाडण्यासाठी मारलेल्या दगडातूनही मी अचूक नेम साधणे आणि वेगात चेंडू फेकण्यासारख्या गोष्टी शिकलो. आयुष्यात कुठलीही गोष्ट लक्षपूर्वक केलीत तर तुम्ही नक्की यश साध्य करू शकता. कलाकाराला आपला मित्र बनवा तो तुम्हाला नैराश्यातून बाहेर काढले, असा संदेश दिला. तसेच यावेळी त्यांनी क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर, सुनील गावसकर, राहूल द्रवीड, विनोद कांबळी आदींच्या मोठेपणाचे किस्से सांगितले.

दूरदर्शनवरील निर्माते जयु भाटकर यांनी रत्ना†िगिरीतील आपल्या अवडाणपणा अत्यंत प्रामाणिकपणे सांगितला. येथील महाविद्यालयीनदशेतील व्यसन, भांडणे आदींचे किस्से अगदी मनमोकळेपणे सांगितले. मात्र याचवेळी आपल्याला अशा काही थोर व्यक्ती भेटल्या ज्यांनी आपल्या आयुष्याला कलाटणी दिली आणि आपण यातून बाहेर पडलो. पाटस्करसरांनी माझ्या आवाजातील निवेदकाचा आवाज ओळखला आणि मला आकाशवाणीवर जाण्यास सांगितले. तिथून दूरदर्शनपर्यंतचा प्रवास झाला. यामध्ये आईची भूमिका अधिक खंबीरपणे पाठीशी उभी रहाणारी होती. मी रत्नागिरी सोडताना तिला नमस्कार केल्यावर तिने वाक्य सांगितले की, लेका मोटो हो, पण खोटो होव नको. आज ती माझी आज पॅचलाईन असल्याचे भाटकर यांनी सांगितले.

तर साखरप्याचे सुपुत्र असलेल्या मंदार जोगळेकर यांनी आज `बुकगंगा'च्या ई-बुकच्या माध्यमातून आज मराठी पुस्तके जगभर पोहोचविली आहेत. या कार्यक्रमात त्यांनीही आपल्या आठवणींना उजाळा दिला. 10 पर्यंतचे साखरप्याला शिक्षण झाले. मनातली जिद्द, आत्मविश्वास वाढवा आणि सकारात्मकदृष्टीने ते पादाक्रांत करण्यासाठी प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळेल, असा संदेश जोगळेकर यांनी यावेळी दिला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दूरदर्शनचे नितीन केळकर आणि रत्नागिरी आकाशवाणीचे सुहास विद्वांस यांनी केले.